[redacted]

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ अन्वये आदेश

(1249)

१८८३

जा.क्र.उनिमि/कर्मचारी विदयार्थी ग्रा.सं. /का.क.७७(अ)/२०१७
उपनिबंधक सहकारी संस्था,मिरज यांचे कार्यालय
दिनांक – १२ /१२/२०१७

20 DEC 2017

वाचले क्र. १ . महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ
२.सचिव,कर्मचारी विदयार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्या सांगली यांचा दि.४/१०/२०१७ चे पत्राने प्राप्त खुलासा
३.श्रीमती एस.व्ही.कोठावळे यांचा दि.३१.१०.२०१७ रोजीचा अहवाल
४.या कार्यालयाची नोटीस जा.क्र.१६२६/उनिमि/कर्मचारी विदयार्थी ग्रा.सं. /का.क.७७ (अ)/२०१७
दिनांक ९/११/२०१६ रोजीची नोटीस.

५६९८

क्र.३

ज्याअर्थी कर्मचारी विदयार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्या सांगली (यापुढे संस्था असा उल्लेख करणेत येईल)ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करणेत आलेली सहकारी संस्था असुन संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कायदा ,नियम १९६१ व संस्था उपविधीनुसार चालविणे संस्थेच्या संचालक मंडळावर बंधनकारक आहे. आणि

ज्याअर्थी, सदर संस्थेची संचालक मंडळाची निवडणूक माहे जानेवारी २०१५ मध्ये झाली असून एकुण ११ संचालकांचे मंडळ बिनविरोध निवडून आले आहे.

ज्याअर्थी, संस्थेच्या सचिवाने वाचले क्र.२ ने संस्थेच्या ११ संचालकापैकी १० संचालकांनी राजीनामा दिला असून सध्या फक्त एकच संचालक कार्यरत असलेबाबत या कार्यालयास कळविले आहे. तसेच श्रीमती एस.वही.कोठावळे यांनी वाचले क्र.३ ने या कार्यालयास सादर केलेल्या अहवालानूसार संस्थेच्या सर्व संचालकांनी राजीनामा दिला असून पैकी फक्त २ संचालकांचे राजीनामे मंजूर आहेत व उर्वरीत ९ संचालकांचे राजीनामा पत्रे मंजूर / नामंजूर संचालकांच्या उपस्थिती अभावी ठरवता येत नाही. संस्थेचे उपविधी क्र. ४४ अ.क्र.११ मधील तरतुदीनुसार पैकी ४ संचालक सलग ६ संचालक मंडळ सभेस गैरहजर राहिले असलेने ते संचालक पदास अपात्र ठरतात.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क. ७७अ (ब-१) मधील तरतूदीनुसार समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला किंवा व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली तर प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याची तरतूद आहे. त्याअर्थी वाचले क्र. ४ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिका-याची नियुक्ती का करणेत येऊ नये याबाबत नोटीस काढून दि.९/११/२०१७ ,२१/११/२०१७ व २८/११/२०१७ रोजी सुनावणी ठेवणेत आली होती. सदर सुनावणीदरम्यान श्री मुल्ला एम.ए. हे संस्थेचे कामकाज करणेस तयार असून प्राधिकृत अधिकारी नेमणेत येवू नये असे म्हणणे सादर केले आहे. तसेच श्री आर.बी. पिंजारी, श्री बी.जी.पाटील, श्री एन.जे.पार्टे व श्री ए.पी.कांबळे यांनी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नेमणेस आमची काही हरकत नाही असे म्हणणे सादर केले तसेच सौ. सावंत व्ही.ए. यांनी वैयक्तीक कारणामुळे संस्थेच्या संचालक पदाचा राजीनामा दिला असून संस्थेवर कोणतीही कार्यवाही झाल्यास हरकत राहणार नसलेबाबत म्हणणे सादर केले. संचालक श्री भाट एच.आर., सौ लोकरे आर.आर. व श्री यमगर एस.एस. यांनी संचालक पदाचा राजीनामा दिला असून ते सुनवाणी वेळी उपस्थित राहिले नाहीत. याचा अर्थ प्राधिकृत अधिकारी नेमणेबाबत त्यांचे काहीच म्हणणे नाही असे दिसून येते.

त्याअर्थी संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली असल्याने संस्थेचे कामकाज पाहणेसाठी प्राधिकृत अधिकारी नेमणे आवश्यक झालेची खात्री झाली असल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन मी डॉ.प्र.अ.बागल उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज , कर्मचारी विदयार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्या सांगली या संस्थेचे कामकाज पाहणेसाठी श्री .एस.एस.बोगार, सहकारी अधिकारी श्रेणी - २ अधिन, उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज यांची नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी ६ महिन्यांचा असून त्यांनी त्वरित दप्तरी चार्ज घेवून तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक १२ /१२/२०१७ रोजी माझी सही व कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.

DEPUTY REGISTRAR CO.OP. SOCIETIES, MIRAJ TALUKA
उप निबंधक, सहकारी संस्था, मिरज तालुका
सत्यमेव जयते
जिल्हा सांगली
DIST. SANGLI

सही
( डॉ.प्र.अ.बागल)
उपनिबंधक
सहकारी संस्था,मिरज

प्रति,

१) सचिव, कर्मचारी विदयार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्या सांगली
२/- संस्थेचे सर्व दप्तर प्राधिकृत अधिकारी यांचे ताब्यात देऊन केले कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) श्री .एस.एस.बोगार, सहकारी अधिकारी श्रेणी - २ अधिन, उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज तथा प्राधिकृत अधिकारी , कर्मचारी विदयार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्या सांगली
२/- यांना कळविणेत येते की,आपण संस्थेच्या दप्तराचा ताबा घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Scanned by CamScanner